# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- २६४** **दिनांक :-२६/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. दि.१२/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३४ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१२/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३४ चे कार्यवृत्त कायम करणे.

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१२/०३/२०२५ बुधवार रोजी सकाळी- ११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.३४ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०२** **प्रशासक ठराव क्र :-२६५** **दिनांक :-२६/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२१७०/२०२४-२५ दि.२५/०३/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.२५/०३/२०२५ चा अभिप्राय
४. आयुक्त यांचा दि.२५/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधा योजने अंतर्गत सन २०२४-२५ अंतर्गत जळगांव शहरातील १ ते १२ विकास कामे सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करणेस मान्यता देण्याबाबत.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ४ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे पत्र क्र.सांबाविज/१८३०/२०२५ दि.२१/०३/२०२५ चे पत्र प्राप्त झाले. शासन निर्णय क्र मनपा-२०२३/प्र.क्र.८७-अ-३६/नवि-१६ मंत्रालय,मुंबई ४०००३२ दिनांक ७ जुन २०२३ नुसार ९ कोटी रकमेची १ ते ८६ कामे मंजूर होते पण त्या शासन निर्णयातील अ.क्र.२४,२६,२७,३०,३१,३४,३५,४०,४९,५०,८१ व ८५ ही १ कोटी २० लाख रुपये रकमेची १२ कामे इतर ठिकाणी पूर्ण झाले असल्यामुळे व काही तांत्रिक अडचणीमुळे शासन शुध्दीपत्रक क्र मनपा-२०२३/प्र.क्र.८७-अ-३६/नवि-१६ (ई-१०२८११९) मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. २० मार्च २०२५ च्या नुसार १ कोटी २० लाख रुपये रकमेची नवीन १ ते १२ कामे मंजूर करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने खाली नमूद १ ते १२ कामांना शासन शुध्दीपत्रकानुसार मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार वरील प्रमाणे कार्यकारी अभियंता सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांचे दि.२१/०३/२०२५ चे पत्रान्वये १ ते १२ कामांकरिता ना-हरकत प्रमाणपत्र व प्रशासक ठराव मिळण्यासंदर्भात कळविले आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर मधील श्री.ए.के.पाटील यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| २. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर मधील औदुंबर बंगलो समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ३. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर आर्यदेव अपार्टमेंट समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ४. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर मधील अमृता अपार्टमेंट समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ५. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर मधील श्री.सुनील डी.चौधरी यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ६. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर मधील श्री.के.बी.पाटील यांच्या घरासमोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ७. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर सिध्दांत अपार्टमेंट समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ८. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत भिकमचंद जैन नगर मधील समर्थ लॉंड्री समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे. |
| ९. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत बी.यु.एन. रायसोनी स्कूल पासून एक्सीस बॅंकेकडे जाणारा रस्त्याचे (कि.मी.०/०५०) कॉंक्रीटीकरण करणे. |
| १०. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत बी.यु.एन. रायसोनी स्कूल पासून एक्सीस बॅंकेकडे जाणारा रस्त्याचे (कि.मी.०५०/१००) कॉंक्रीटीकरण करणे. |
| ११. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत बी.यु.एन. रायसोनी स्कूल पासून एक्सीस बॅंकेकडे जाणारा रस्त्याचे (कि.मी.१००/१५०) कॉंक्रीटीकरण करणे. |
| १२. | प्रभाग क्र.०८ अंतर्गत बी.यु.एन. रायसोनी स्कूल पासून एक्सीस बॅंकेकडे जाणारा रस्त्याचे (कि.मी.१५०/२००) कॉंक्रीटीकरण करणे. |

उक्त ०१ ते १२ कामांना सार्व. बांधकाम विभाग यांच्या मागणी नुसार कामांना ना- हरकत दाखला खाली नमुद अटी शर्तीच्या अधिन राहुन देण्यास व ०१ ते १२ कामे सार्व बांधकाम विभाग, जळगांव यांच्या मार्फत करण्याबाबत महासभा/मा.प्रशासक यांची मान्यता होवुन ठराव पारित होण्याकरीता प्रस्ताव सभेपुढे सादर.

१. प्रमाणित करण्यात येते की ,खाली नमुद कामाची जागा मनपा कब्जेवहीवाटीतील आहे.

२. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद काम आपल्या कार्यालयाकडून पूर्ण झाल्यानंतर मनपाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर कामाची दोष दायीत्व पुर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल व दुरुस्ती मनपा जळगांव मार्फत करण्यात येईल.

३. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेले काम कोणत्याही योजनेतुन मंजुर अथवा प्रस्तावित नाही.

४. प्रमाणित करण्यात येते की, खाली नमुद प्रस्तावित केलेल्या कामांची जागा अतिक्रमण विरहीत आहे.

५. ज्या रस्त्यांवर भुमिगत गटारींचे काम झालेले नाही अश्या रस्त्यांच्या क्रॉक्रीटीकरणाच्या प्रस्तावात सदर रस्त्यावर भविष्यात भुमिगत गटारी साठी खोदकाम करण्यात येणार असलेने त्यासाठी रस्त्यांचे नुकसान होणार नाही अश्या प्रकारचे नियोजन करणे व त्याकरीता आवश्यक बाबींचा समावेश अंदाजपत्रकीय प्रस्तावात करणे आवश्यक राहील.

६. रस्त्यावर मलनिस्सारण योजनेचे असलेली मुख्य चेंबर व घरजोडणी चेंबर कोणत्याही परिस्थितीत रोड खाली दबाई होणार नाही याची दक्षता घ्यावी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार पाणी पुरवठा व मलनिस्सारण सेवा अत्यावश्यक सेवेत समाविष्ट असल्याने अशी कृती नियमांचे उल्लंघन करणारी ठरेल रस्त्याखाली दबाई झाल्यानंतर आपण नियुक्त केलेले मक्तेदार यांनी तात्काळ स्वखर्चाने पुर्ववत व सुस्थितीत करण्याचे नियोजन ठेवणे आवश्यक राहील याची नोंद घ्यावी.

७. सदर रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करण्यासाठी रोड स्क्रपींग करणे , खोदकाम करणे, हि कामे करीत असतांना जलवाहीनीची अथवा नागरीकांचे नळ संयोजनचे कोणतेही नुकसान झाल्यास, तुट फुट झाल्यास, त्याची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक राहील.

८. रस्त्याचे काम करतांना त्या रस्त्यावरील भुमिगत मलनिस्सारण योजनेची चेंबर असल्यास त्याची तुट फुट होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक राहील, तसेच सदर चेंबर रस्त्याच्या पृष्ट भागाशी समतल करणे आवश्यक राहील व त्यासाठी अंदाजपत्रकात देखिल तरतुद करणे आवश्यक राहील. प्रस्तावातील कोणत्याही रस्त्याचे काम सुरु करण्यापुर्वी सात दिवस आधी सुचित करणे आवश्यक राहील, त्यामुळे त्या रस्त्यावरील पाईपलाईन दुरुस्ती नळ संयोजन अथवा इतर आवश्यक कामे मनपा मार्फत पुर्ण करुन घेणे शक्य होईल.

उपरोक्त अटी शर्तीस बंधनकारक राहुन ना-हरकत दाखला देण्यास कार्योत्तर मान्यता दिलेली आहे त्यास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ४ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे. उपरोक्त कामांमध्ये व्दिरुक्ती होणार नाही याची काळजी घ्यावी.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत तसेच कामांची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०३** **प्रशासक ठराव क्र :-२६६** **दिनांक :-२६/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२१८७/२०२४-२५ दि.२६/०३/२०२५
३. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :- जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम सन** २०२३-२४ **अंतर्गत शहरातील** ०१ **ते** ०४ **विकास कामांना मान्यता देणे बाबत**.

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

अल्पसंख्याक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत महाराष्ट्र शासन,शासन निर्णय क्रं. क्षेविका-२०२४/प्र.क्रं.५३/का-०९ दि.३० मार्च २०२४ खाली नमुद ०१ ते ०४ कामे करण्याकरीता रक्कम रु. १.०० कोटी मात्रचा निधीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्रं.०२ चे पत्रानुसार सदर कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यास जिल्हाधिकारी कार्यालया कडील पत्र क्रं. न.वि.शाखा/जि.प्र.क.स.५/E-Office /Comp. No. १५३६४१४/२०२५ दि.२०/०३/२०२५ अन्वये सुचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार खालील ०१ ते ०४ कामांचे अंदाजपत्रके तयार करण्यात आलेले आहे.

त्यानुसार खालील ०१ ते ०४ कामांच्या अंदाजपत्रकांना सन २०२३-२४ या आर्थीक वर्षातील तरतुदी अंतर्गत मान्यता होण्याकरीता महासभेची मान्यता आवश्यक असल्याने महासभा/प्रशासक यांची मान्यता होवुन तातडीने प्रशासकीय ठराव होण्याकरीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | तांत्रिक मान्यता जशमनपा पत्र क्रं. व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | प्रभाग क्रं.०२ अंतर्गत शिवाजी नगर येथील ख्रिश्चन समाज दफनभुमी सुशोभिकरण करणे | १५०००००/- | TS/PWD ३६७<br>दि. २४/०३/२०२५ | १४९३७१६/- |
| २. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नं.२१४/२ न्यु ख्वाजा नगर येथील ओपनस्पेस मध्ये समाज हॉल बांधणे | ३००००००/- | TS/PWD ३६८<br>दि. २४/०३/२०२५ | २९९५१५५/- |
| ३. | प्रभाग क्रं.१० अंतर्गत गट नं.२१२,२१३ सुन्नी इदगाह कब्रस्तान येथील ओपनस्पेस सुशोभिकरण करणे | ३००००००/- | TS/PWD ३६९<br>दि. २४/०३/२०२५ | २९९०६३२/- |
| ४. | प्रभाग क्रं.१९ अंतर्गत गट नं.१८३, प्रेमाबाई शाळेजवळ सुप्रिम कॉलनी येथील ओपनस्पेस मध्ये समाज हॉल बांधणे | २५०००००/- | TS/PWD ३७०<br>दि. २४/०३/२०२५ | २४९९६३७/- |
| | एकुण :- | १००००००0/- | | ९९७९१४०/- |

वरील कामास प्रशासकीय मान्यतेची आवश्यकता असल्याने प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता तसेच महासभा/प्रशासक यांची मान्यता होण्यास व तसा ठराव प्राप्त झाल्यानंतर जिल्हाधिकारी जळगांव यांच्याकडेस वरील कामांचा प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.३५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०४** **प्रशासक ठराव क्र :-२६७** **दिनांक :-२६/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२१८८/२०२४-२५ दि.२६/०३/२०२५
३. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय
४. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :- जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महिला बचत गट साहित्य विक्री करीता दुकान केंद्राचे बांधकाम नगररचना क्रं**.०२ **मधिल अंतिम भुखंड क्रं**.१६७ **ब येथील जागा क्षेत्र** १४१२.२० **चौ.मी**. **या जागेवर करण्यास मान्यता होण्याबाबत**

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मा.आ.श्री. सुरेश दामु भोळे (राजु मामा) विधानसभा सदस्य जळगांव शहर यांचे पत्र क्रं. जा.क्रं. एस बी/विसस/मार्च/८७/२०२५ दि.२४/०३/२०२५ पत्र प्राप्त झालेले आहे त्यात महिला बचत गट साहित्य विक्री करीता दुकान केंद्राची व्यवस्था करण्या करीता लागणारा खर्चाचा प्रस्ताव नियोजन समितीकडेस सादर करण्याबाबत सुचित केलेले आहे. त्याअनुषंगाने बचत गट साहित्य विक्री केंद्राकरीता दुकानकेंद्र बांधकाम करण्या करीता जागा निश्चित करण्याकरीता सहा.संचालक, नगररचना, नगररचना विभाग मनपा जळगांव यांना पत्र क्रं.जशमनपा साबा/२१४८/२०२४-२५ दि.२४/०३/२०२५ अन्वये कळविण्यात आले. त्यानुसार सहा.संचालक नगररचना यांनी त्यांच्याकडील पत्र क्रं. जशमनपा/१४१७ दि.२५/०३/२०२५ चे पत्रानुसार सदरचे दुकानकेंद्र बांधकाम करण्याकरीता नगर रचना क्रं.०२ मधिल अंतिम भुखंड क्रं.१६७ ब येथील जागा क्षेत्र १४१२.२० चौ.मी. ही जागा मिळकत पत्रीकेनुसार सदरील जागा अध्यक्ष नगरपरिषद जळगांव या नावे आहे. सदरील ठिकाणी एकत्रीकृत विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी नुसार महिला बचत गट साहित्य विक्री करीता दुकान केंद्राची व्यवस्था हा वापर अनुज्ञेय होईल असे सुचित केलेले असल्याने त्या ठिकाणी बहिणा मार्ट असे नामकरण करुन महिला बचत गट केंद्र साहित्य विक्री करीता दुकान केंद्र चे बांधकाम करण्याकरीता महासभेची मान्यता आवश्यक असल्याने महासभेची मान्यता होण्यास तसेच जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव यांच्या कडील पत्र क्रं. जिनीस/जिवायो/४५३ दि.२६/०३/२०२५ अन्वये सदर कामाचा सविस्तर प्रस्ताव सक्षम प्राधिकारी यांची मान्यता, त्याकरीता शासकीय जागा उपलब्ध असल्याचा दाखला, देखभाल दुरुस्तीची हमी, स्थानीक स्वराज्य संस्थेचा ठराव व आवश्यक परीपुर्ण दस्ताऐवजांसह सादर करण्यास सुचित केलेले आहे. त्यानुसार महासभा/प्रशासक यांचा सभेचा ठराव पारीत करणे आवश्यक आहे.सदर प्रस्ताव महासभेच्या मान्यतेकरीता सादर.

तसेच सदर बांधकाम करण्याकरीता वास्तुविशारद नेमणुक करणे आवश्यक आहे. वास्तुविशारदा कडुन सदर कामाचे नकाशे,अंदाजपत्रके व कामावर देखरेख करण्या करीता वास्तुविशारद यांच्या कडुन दर पत्रकावर बंदीस्त पाकीटातुन दर मागविण्यास तसेच सदर बांधकामा करीता अंदाजे रक्कम रु.५.०० कोटी मात्रचा अपेक्षीत खर्च असुन सदरचा खर्च मा.आमदार महोदय यांच्या पत्रानुसार जिल्हा नियोजन समिती,जळगांव यांच्या कडेस निधी मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यास मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाहीत तसेच कायदेशीर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०५** **प्रशासक ठराव क्र :-२६८** **दिनांक :-२६/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचेकडिल जा.क्र./बांधकाम/२१९०/२०२४-२५ दि.२६/०३/२०२५
३. सहाय्यक आयुक्त यांचा दि.०९/०७/२०२४ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१६/०७/२०२४ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा अभिप्राय

**विषय :- मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०३ मध्ये सागर नगर मधील स.नं.१२१/अ प्लॉट नं.१५ ते प्लॉट नं.०१ (गोपाल कृष्ण मित्रमंडळ ते A-१ भरीत सेंटर) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.**

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, **मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०३ मध्ये सागर नगर मधील स.नं.१२१/अ प्लॉट नं.१५ ते प्लॉट नं.०१ (गोपाल कृष्ण मित्रमंडळ ते A-१ भरीत सेंटर) पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे आवश्यक असून सदर कामी महाराष्ट्र राज्य दरसुची सन २०२३-२४ नुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. उक्त कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.२९,७३,६६७/- मात्र खर्च असुन पुढील तांत्रिक तथा प्रशासकीय मान्यतेस्तव तसेच सदर ठिकाणी रस्त्याचे काम करणे आवश्यक असल्याने मनपा निधी अंतर्गत नविन रस्ते या लेखाशिर्षामधुन प्रस्तुतचे कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेस तसेच निविदा प्रक्रीया राबविणेस** मान्यता मिळण्यासाठी शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.३५** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०६** **प्रशासक ठराव क्र :-२६९** **दिनांक :-२६/०३/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक :- एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई -३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांचेकडिल जा.क्र./आरोग्य वि./११८१/१/२०२४-२५ दि.२४/०३/२०२५
३. सहा.संचालक, नगररचना यांचा दि.११/०३/२०२५ चा अभिप्राय
४. शहर अभियंता यांचा दि.१९/०३/२०२५ चा अभिप्राय
५. सहाय्यक आयुक्त, (स्वच्छता) यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय
६. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.२४/०३/२०२५ चा अभिप्राय

**विषय :- जळगांव शहरातील नागरीकांसाठी शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील तहसिल कार्यालय व जिल्हा परिषद जवळ रेल्वे पुलाखाली अत्यंत रहदारी असलेल्या वर्दळीच्या ठिकाणी तसेच शिवाजी नगर कडील बाजुस रेल्वे पुलाखाली मोकळया जागेत स्त्री व पुरुषांसाठी सुलभ शौचालय रोटरी क्लब,जळगांव यांचेमार्फत स्व:खर्चाने बांधणे कामी मान्यता देणेबाबत**.

---

वाचा क्र.१ व शहर अभियंता, सार्व.बांधकाम विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

रोटरी क्लब जळगांव ही संस्था गेली ७५ वर्षे जळगांव मध्ये कार्यरत असून समाजाच्या वंचित अपेक्षीत घटकांसाठी वेगवेगळया प्रकारच्या सेवा नियमितपणे पुरवीत असते. ७५ वे वर्ष साजरे करीत असतांना व्याख्यानमाला, समाजप्रबोधन, मोफत आरोग्य तपासणी व उपचार, अस्थिरोग दवाखाना, महिला सबलीकरण आदी उपक्रमांवर कार्यरत आहे.

तसेच जळगांव शहरातील समाजाची गरज लक्षात घेवून सार्वजनिक शौचालये व मुतारी उभारण्याचा व शहरातील चौक सुशोभिकरण इ. करण्याचा मानस आहे असे पत्रात नमूद केलेले आहे.

करिता जळगांव शहरातील नागरीकांसाठी शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील तहसिल कार्यालय व जिल्हा परिषद जवळ रेल्वे पुलाखाली अत्यंत रहदारी असलेल्या वर्दळीच्या ठिकाणी तसेच शिवाजी नगर कडील बाजुस रेल्वे पुलाखाली मोकळया जागेत स्त्री व पुरुषांसाठी सुलभ शौचालय रोटरी क्लब,जळगांव यांचेमार्फत स्व:खर्चाने उभारणी केल्यास नागरीकांच्या सोयीचे होईल.

करिता रोटरी क्लब,जळगांव यांना नागरीकांसाठी शौचालये व मुतारी स्वखर्चाने बांधकामासाठी परवानगी देणेस मान्यता मिळण्यासाठी सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच आरोग्य विभाग, बांधकाम विभाग व नगररचना विभाग यांचे अहवालानूसार विकासकास शिवाजी नगरच्या पुलाखाली दोन्ही बाजूला (उत्तर दक्षीण भागात) व तहसील कार्यालयाचे मागे तसेच शिवाजी नगरकडे रहदारीस व दळणवळणास अडथळा निर्माण होणार नाही या अटीवर व विभागाने सदर ठिकाणी मलनिस्सारण बाबतीत सुविधेची खात्री करावी तसेच शौचालयासाठी वापरण्यात येणारी जागा हस्तांतरण वगैरे करता येणार नाही या अटींवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**